जिल्हा परिषद
अहमदनगर

# शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर.

जिल्हा परिषद आवार, अहमदनगर - ४१४००१

E-Mail- rmsaahmadnagar@gmail.com दुरध्वनी क्रमांक ०२४१-२३२७०९९

जा.क्र-अजिप/शिविउमा/प्रवेशप्रक्रिया/२४-२५/कार्या-५/१४६/३१६४ दिनांक २८/०५/२०२४

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक (सर्व व्यवस्थापन)
अनुदानित/अंशतः अनुदानित/विनाअनुदानित/स्वयंअर्थसहाय्यित
उच्च माध्यमिक विद्यालये/कनिष्ट महाविद्यालये,जिल्हा-अहमदनगर

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मधील इ.११वी प्रवेशाबाबत.**

संदर्भ :-१.प्रवेश क्षमता निश्चिती अहवाल उमाशि/२८२/२०२२ अ.नगर दि.२९.०७.२०२२
२.मा.शिक्षण संचालक परिपत्रक क्र.विद्या-ए-१/११.प्रवेश/२०२४दि.२०.०५.२०२४
३.कार्यालयीन पत्र जा.क्र.अजिप/शिविउमा/प्रवेशप्रक्रिया/२४-२५/कार्या-५/१३९/३११८दि.२२.०५.२०२४
४.मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचा दूरध्वनी संदेश दि.२८.०५.२०२४

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की,अहमदनगर जिल्हयातील इयत्ता ११ वी प्रवेशाबाबत व फी शुल्काबाबत शासन निर्णयात नमूद केलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

१.इयत्ता ११ वी सर्व शाखांच्या प्रवेशासाठी सर्व उच्च माध्यमिक विद्यालये/कनिष्ठ महाविद्यालयाने ऑफलाईन प्रवेश अर्ज विद्यार्थ्यांना मोफत/ स्वतंत्र ऑनलाईन प्रवेशाची लिंक तयार करुन उपलब्ध करुन द्यावेत.
२) प्रवेश प्रक्रिया राबविताना संवर्गनिहाय आरक्षण,गुणवत्ता,भौतिक व शैक्षणिक सुविधेनुसार प्रवेश क्षमता निश्चित करणे.
३) प्रवेश देताना १)अनुदानित २)अंशतः अनुदानित ३) विनाअनुदानित ४) स्वयंअर्थसहायित या क्रमाचे पालन करावे.
४) संदर्भ क्र.१ मधील मान्य प्रवेश क्षमतेपेक्षा जास्तीचे प्रवेश देऊ नयेत.
५) २० टक्के व ४० टक्के अनुदान षेत असलेल्या उच्च माध्यमिक विद्यालये/ कनिष्ठ महाविद्यालयांनी वेळोवेळी निर्गमित शासन परिपत्रकातील सूचनांप्रमाणे फी किंवा शुल्क आकारणी करावी.
६) प्रवेश प्रक्रिया पुढील वेळापत्रकानुसार पारदर्शी व नियोजनपूर्वक पूर्ण करण्यात यावी.

| अ.क्र | दिनांक | कार्यवाही |
|---|---|---|
| १. | दि.२८.०५.२०२४ ते दि.०४.०६.२०२४ | प्रवेश अर्ज वाटप व स्विकृती प्रक्रिया (दि.०४.०६.२०२४ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत) |
| २. | दि.०५.०६.२०२४ ते दि.०६.०६.२०२४ | प्रवेश अर्ज छाननी करणे व गुणवत्ता यादी तयार करणे. |
| ३. | दि.०७.०६.२०२४ | सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे. |
| ४. | दि.०८.०६.२०२४ | गुणवत्ता यादीतील आक्षेप /हरकती स्विकारणे व निकाली काढणे. |
| ५. | दि.१०.०६.२०२४ | दुपारी ०३:०० वाजेपर्यंत पहिली गुणवत्ता यादी तयार करणे व प्रदर्शित करणे |
| ६. | दि.११.०६.२०२४ ते दि.१८.०६.२०२४ | दि.१८/०६/२०२४ दुपारी ०३:०० वाजेपर्यंत प्रवेश देणे |
| ७. | दि.१९.०६.२०२४ | दुपारी ०३:०० वाजेपर्यंत दुसरी गुणवत्ता यादी तयार करणे व प्रदर्शित करणे |
| ८. | दि.१९.०६.२०२४ ते दि.२४.०६.२०२४ | दि.२४/०६/२०२४ दुपारी ०३:०० वाजेपर्यंत प्रवेश देणे |
| ९. | दि.२५.०६.२०२४ | दुपारी ०३:०० वाजेपर्यंत तिसरी गुणवत्ता यादी तयार करणे व प्रदर्शित करणे |
| १०. | दि.२६.०६.२०२४ ते दि.२९.०६.२०२४ | दि.२९/०६/२०२४ दुपारी ०३:०० वाजेपर्यंत प्रवेश देणे |
| ११. | दि.०१.०७.२०२४ ते दि.०३.०७.२०२४ | जागा शिल्लक असल्यास गुणवत्तेनुसार प्रवेश देणे |

सर्व उच्च माध्यमिक विद्यालये/कनिष्ठ महाविद्यालयांनी दि.०१.०७.२०२४पासून इयत्ता ११ वी वर्ग शासन परिपत्रकाच्या अधिन राहून सुरु करावेत.इयत्ता ११ वी प्रवेशासाठी यापूर्वी शासनाने परिपत्रकात दिलेल्या व मागील वर्षी प्रवेशासाठी सांगितलेल्या सर्व सूचनांचे व आरक्षण धोरणाचे पालन करण्याची जवाबदारी मुख्याध्यापक /प्राचार्य यांची राहील.

(अशोक कडूस)
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रत माहितीस्तव:- मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१